# कोण माया

मी म्हणजे माझे प्राण
तू म्हणजे तुझे नाम
राहतो हा प्राण देहात
राहे तूही तसा नामात ||१||

दिसे देह हा परी ना प्राण
अदृश्य तू नि तुझेही नाम
पडता श्रवणी तुझे नाम
झिरपे माझ्या ते कानातून ||२||

उतरे जेव्हां ते जिव्हेवरी
कळे अवीट त्याची माधुरी
होई वाणी त्या नामाची वेडी
जुळे दोघांची अतूट जोडी ||३||

प्राण प्रभूनाम ऊर्जा दोन
होता एकत्रित माया कोण ||४||

– नारायण
०८/०५/२३